# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

**GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL,NAGPUR**

*Tele. No. Office:-2743588* *FAX NO. 0712-274448*

No. pwd /PS/Qt/Enq./ 9704 /2025 Dt.08 /05/2025

**Quotation**

दरपत्रक सुचना

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील परिसरामधील असलेली विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणे व उचल करणे यांचे दरपत्रक पध्दतीने विक्री करणे करीता इच्छूक लिलावदारांचे सहभागाकरीता सदर सुचना प्रसिध्द करण्यात येत असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

- या संस्थेतील प्रस्तावित नविन पार्कींग प्लाझा इमारतीच्या जागेमध्ये असलेली झाडे - ५० झाडे, (चंदन प्रजातीचे एक वृक्ष बगळून)

वरील कामाचे विवरणपत्र सोबत जोडलेले असुन या **रकमेपेक्षा कमी कीमतीचे देयकार स्विकारण्यात येणार नाही.**

१) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेतील परिसरामध्ये असलेल्या विविध प्रकारची उभी असलेली झाडे यांना दर लागू राहिल. दरपत्रके www.gmcnagpur.org या संकेतस्थळावर उपलब्ध असुन सदर दरपत्रके या कार्यालयातील बांधकाम विभागास सादर करावी.

२) इच्छुक दरपत्रकदारकाचे दस्ताऐवज व अन्य बाबतची पडताळणी संस्थेतील समितीकडुन करुन त्यांना सहभागी होणेसाठी पात्र करण्यात येईल.

३) ईच्छुक लिलावदारांनी दि.०८/०५ /२०२५ ते दि.१४/०५/२०२५ (वेळ १७.००) या कालावधीत आवश्यक बाबींची पूर्तता करुन विक्री करावयाची विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणे व उचल करणे यांची किंमत संपुर्ण माहितीसह दरपत्रकामध्ये सादर करावे तसेच झाडे कापण्याचा दर जीएसटीसह इत्यादी आकारणी व अधिभारासहीत दरपत्रकरमध्ये नमुद करुण दरपत्रके या कार्यालयात सादर करावे.उशिरा प्राप्त झालेले कोटेशन स्विकारण्यात येणार नाही

४) उक्त नमुद कालावधीच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दरपत्रकाद्वारे विक्री करावयाची विविध प्रकारची उभी असलेली झाडे लिलावदार यांना पाहण्याची मुभा आहे.

५) दरपत्रकामध्ये जे लिलावदार H-१ मुल्यांकण दराच्या वर राहिल त्यांना झाडे उचल करण्यापुर्वी आदेशातील अटी व शर्ती लागु राहतील. तसेच मंजुर करण्यात आलेल्या निविदाकारास रु.१००/- च्या स्टॅम्प पेपर वर करारनामा करावा लागेल.

६) ज्या दरपत्रकदारकाचे स्विकृती नंतर त्वरीत कामास उपविभागीय अभियंता सा.बा.वि.कं.५,नागपूर यांच्या निर्देश्रखाली झाडे कापणे व उचल करणे याची सुरवात करावी लागेल संम्पुर्ण झाडे कापणे व उचल करणे काम १५ दिवसात पूर्ण करावे लागेल.सदर कामास विलंब झाल्यास प्रतिदिवस रु.५००/- प्रमाणे क्षतिपूर्ती आकारण्यात येईल.

७) संस्थेत असलेल्या विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणे व उचल करणे या लिलावाबाबत मागविण्यात येत असलेल्या दरपत्रके रदद करण्याचा अथवा यामध्ये वदल करण्याचा अधिकार अधिष्ठाता शावैमवरु यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

८) दरपत्रकासोबत लिलावदार/कंत्राटदार यांनी नोंदणीकृत प्रमाणपत्र, आधार कार्ड व भ्रमणध्वनी क्रमांक सोबत जोडण्यात यावे.

**अधिष्ठाता**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
जावक 6293
दिनांक 03/4/25

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)
छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, 6 वा माळा,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-400001
Email-gardendept.nmc@gmail.com

क्रमांक :- NMC/OWL/GRDN/~~2024-25~~/.......352 2025-26 दिनांक ~~/03/2025~~ 02/04/2025

प्रति,
1. मा. अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर

**विषय :-** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर परिसरातील प्रस्तावित नवीन पार्किंग प्लाझा क्र 1, 2 व 3 च्या इमारतीच्या, बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडास कापणी/प्रत्यारोपण करण्याची परवानगी मिळण्याबाबत.

**संदर्भ:-** कार्यालयास प्राप्त आपल्या दिनांक 16.12.2024 च्या पत्रान्वये.

वरील पत्रान्वये मोक्यावर जाऊन झाडाची/ झाडांची पाहणी करून झाडाच्या/झाडांच्या स्थितीचे निरीक्षण केले असता –

**मा. प्रशासक तथा अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, म.न.पा. नागपूर यांनी दिनांक 11.02.2025 ला दिलेल्या मंजुरी अन्वये,** आपणास खालील झाडे कापणी करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर परिसरातील प्रस्तावित नवीन पार्किंग प्लाझा क्र 1, 2 व 3 च्या इमारतीच्या, बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या पुरातन (हेरीटेज) 01 नग व नॉन हेरीटेज 02 झाडास प्रत्यारोपण व जमिनीपासून कापणी करण्यात येणाऱ्या पुरातन (हेरीटेज) 6 व नॉन हेरीटेज 42 अश्या एकूण (1+2+6+42= 51) 51 नग झाडास कापणी/प्रत्यारोपण करण्याची आपणास परवानगी देण्यात येत आहे.**

1. आपणास परवानगी पत्रात उल्लेखलेल्या झाडाव्यतिरिक्त इतर प्रजातीची झाडे/ झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी करण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.
2. आपणास झाड/झाडे/झाडांच्या फांद्या स्वखर्चाने व स्वतःच्या जबाबदारीवर कापणी/छाटणी कराव्या लागतील. झाड/झाडे/ कापणी करतांना रहदारीला अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.
3. **तोडण्यात येणाऱ्या 51 नग झाडाऐवजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021/आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट–कलम (4) (ब) अन्वये तोडण्यात येणाऱ्या त्याच जातीची किंवा इतर कोणत्याही मूळ जातीची तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजित केलेल्या वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान सहा फुट इतक्या उंचीची 1382 नग नविन झाडांची लागवड करावी. पोट-कलम (5अ) अन्वये लागवड करण्यात येणारी झाडे आपणास कमीत कमी सात वर्षाच्या कालावधी करिता जगवावी लागेल. या कालावधीत झाडे न जगल्यास तितक्याच संख्येतील झाडांची लागवड करून त्याची हानीपुर्ती (भरपाई) करण्यात यावी. तसेच लागवड करण्यात आलेल्या झाडाचा फोटोसह अहवाल दर सहा महिन्यात कार्यालयास सादर करावा.**
4. सदर परवानगी पत्रानुसार व नमूद केलेल्या अटीनुसार झाड/झाडे/झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी कराव्या लागतील अन्यथा महाराष्ट्र (शहरी क्षेत्र) वृक्षजतन (सुधारित) अधिनियम 1975 अन्वये आपल्यावर कार्यवाही करण्यात येईल.
5. **वृक्ष तोडण्याची परवानगी दिल्यापासून 15 दिवसानंतरच वृक्ष तोडण्यात यावे.**
6. वृक्ष प्रत्यारोपण (Transplant) करण्याकरिता तांत्रिक सल्ला आवश्यक असल्यास उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, म.न.पा. नागपूर ला संपर्क साधावा.
7. **हेरीटेज वृक्ष असल्यास आपण हेरीटेज वृक्षाची कापणी करू नये. हेरीटेज वृक्षाची कापणी केल्यास महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021 / आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 8 मुख्य अधिनियमाच्या कलम 21 मधील पोट–कलम (1) मध्ये एक हजार रुपयापेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या या मजकुराऐवजी शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल, अश्या पद्धतीचा वापर करून काढलेल्या झाडाच्या मुल्याइतके परंतु 1,00,000/- रुपयापेक्षा कमी नसेल इतक्या रकमेचा मजकूर दाखल करणायत येईल. कृपया याची नोंद घ्यावी.**
8. परवानगी देऊनही झाड किंवा झाडाच्या फांद्या न कापणी केल्यास झाड किंवा झाडाची फांदी पडून जीव व वित्तहानी झाल्यास सर्वस्वी जवाबदारी आपली राहील. कृपया याची नोंद घ्यावी.
9. **तोडण्यात येणाऱ्या 51 नग झाडाच्या मोबदल्यात पर्यायी नविन सावलीची 1382 नग वृक्ष लागवड करून छायाचित्रासह नियोजन आरखडा 30 दिवसांच्या आत या कार्यालयात सादर करावे.**

वृक्ष संवर्धक
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्र. बांधकाम विभाग
3/4

**प्रतिलिपी :-** 1. वनपरिक्षेत्र सेमिनरी हिल्स, नागपूर यांना माहितीकरिता सादर.
2. कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक (वै.)सा. बा. विभाग, नागपूर